# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २०/०६/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा सावंगी येथे दिनांक २०/०६/२०२२ चे रात्री १:३० ते ०६:३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— श्रीमती उज्वला संजय भोतमांगे, वय ४८ वर्ष, रा. सावंगी ही तिचे सासरे यांना दवाखान्यात भरती केल्याने घरी कोणी नसल्याने रात्री जेवण खावन करुन जाऊ हिचे घरी झोपण्यास गेली. त्यांनी ०१:३० वा. पर्यंत गप्पा गोष्टी केल्यानंतर झोपले. रात्री दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे दाराची कडी तोडून घराच्या आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने आलमारीचे दार उघडून त्यामध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने कि. ५०,०००/—रू. व नगदी २०,०००/—रू. असा एकुण कि. ७०,०००/—रू. चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

### जनावर चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा तोंडाखैरी येथे दिनांक १९/०६/२२ चे १८:५५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— दामोदर दत्तुजी ठाकरे, वय ६२ वर्ष, रा. तोंडाखैरी त नागपूर यांचे तोंडाखैरी शिवारात शेत असून शेतात जनावराचा गोठा आहे. त्या गोठयामध्ये दोन बैल व दोन गाय बांधलेल्या असतात फिर्यादी हे नेहमी प्रमाणे सायंकाळी चारापाणी करून घरी गेले दुसऱ्या दिवशी शेतात आले असता बैल दिसले नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे कि. २०,०००/— रू. चा जनावरे चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार सुनिल कामडी मो.नं. ९८२३३२४८२६ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील काटोल येथे दिनांक १९/०६/२२ चे ०७.३० वा. ते ०९.३० वा. सुमारास आरोपी नामे— गंगाधर चिंतामन क्षिरसागर(मृतक), वय ७७ वर्ष, रा. गुडलुक सोसायटी जयताळा जि. नागपूर याचे शेत हे येणीकोणी शिवारात असुण आरोपी शेतात एमएच—३१/ईआर— ९६३७ क्रमांकाच्या डिस्कव्हर मोटरसायकलने जात होता. त्याचे ताब्यातील मोटरसायकल स्लिप होवुन अपघात झाला व तो स्वत:चे मरणास कारणीभुत ठरला. त्यानंतर फिर्यादी यांना माहित पडले असता फिर्यादी याने जावुन पाहले असता प्रेत ग्रामीण रूग्णालय काटोल येथे ठेवले होते.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— गणेश गंगाधर क्षिरसागर, वय ४८ वर्ष, रा. गुडलुक सोसायटी जयताळा जि. नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४, मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री आगासे मो.नं. ८४४६२८३९२५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**